
# २ पुण्णिका थेरी

(पुढील गाथा खुद्दकनिकायातील ‘थेरीगाथा’ या काव्यसंग्रहातून घेतल्या आहेत. पुण्णिका ही एका मोलकरणीची मुलगी. ती बुध्दाच्या उपदेशाने साधक भिक्खुणी झाली. पहाटेला कुडकुडत नदीत स्नान करणाऱ्या एका ब्राम्हणाशी तिचा संवाद झाला. ती म्हणाली की, खरी शुध्दी पाण्यात बुडी मारून होत नाही. कारण तसे असेल तर सतत पाण्यात असणारे जलचर प्राणी अत्यंत शुध्द म्हणून स्वर्गाचे अधिकारी ठरतील. शिवाय नद्या तर सर्व काही वाहून नेतात तर पापाबरोबर एखाद्यावेळेस पुण्यही वाहून नेतील. अशाप्रकारे त्या ‘उदकसुध्दिक’ म्हणजे ‘स्नानाने पाप धुतले जाते’ असे मत असलेल्या ब्राम्हणाचे मतपरिवर्तन पुण्णिका करते. या गाथांमध्ये असलेला संवाद अत्यंत जिवंत आणि उद्‌बोधक आहे.



'उदहारी अहं सीते, सदा उदकमोतरि।
अय्यानं दण्डभयभीता, वाचादोसभयट्टिता।।१।।

कस्स ब्राह्मण त्वं भीतो सदा उदकमोतरि।
वेधमानेहि गत्तेहि, सीतं वेदयसे भुसं'.।।२।।

'जानन्ती च तुवं भोति, पुण्णिके परिपुच्छसि।

करोन्तं कुसलं कम्मं, रून्धन्तं कम्मं पापकं।।३।।

यो च वुड्ढो वा दहरो वा, पापकम्मं पकुब्बति।
उदकाभिसेचना सो'पि, पापकम्मा पमुच्चति।।४।।

'को' नु ते इदमक्खासि, अजानन्तस्स अजानतो।
उदकाभिसेचना नाम, पापकम्मा पमुच्चति।।५।।

सग्गं नून गमिस्सन्ति, सब्बे मण्डूककच्छपा।
नागा च सुंसुमारा च, ये च'ञ्ञे उदकेचरा ।।६।।

ओरब्भिका सूकरिका, मच्छिका मिगबन्धका।
चोरा च वज्झघाता च, ये च'ञ्ञे पापकम्मिनो ।
उदकाभिसेचना ते पि, पापकम्मा पमुच्चरे।।७।।

सचे इमा नदियो ते पापं, पुब्बेकतं वहेय्युं।
पुञ्ञम्पि'मा वहेय्युं, ते तेन त्वं परिबाहिरो (अस्स)।।८।।

यस्स ब्राह्मण त्वं, भीतो सदा उदकमोतरि।
तमेव ब्रह्मे मा कासि, मा ते सीतं छविं हने।।९।।

'कुमग्गं पटिपन्नं मं, अरियमग्गं समानयि।
उदकाभिसेचनं भोति, इमं साटं ददामि ते'।।१०।।

तुय्हेव साटको होतु, ना'हं इच्छामि साटकं।
सचे भायसि दुक्खस्स, सचे ते दुक्खमप्पियं।।११।।

मा कासि पापकं कम्मं, आवि वा यदि वा रहो।
सचे च पापकं कम्मं, करिस्ससि करोसि वा।।१२।।

न ते दुक्खा पमुत्य' त्थि, उपेच्चापि पलायतो।
सचे भायसि दुक्खस्स, सचे ते दुक्खमप्पियं।।१३।।

उपेहि सरणं बुध्दं, धम्मं सङ्घञ्च तादिनं।
समादियाहि सीलानि, तं ते अत्थाय हेहिति'।।१४।।

'उपेमि सरणं बुध्दं, धम्मं सङ्घञ्च तादिनं।
समादियामि सीलानि, तं मे अत्थाय हेहिति'।।१५।।

**शब्दार्थ / सद्दत्थ**

**उदहारी (वि.)** – पाणी भरणारी, पाणी आणणारी.

**दण्डभय (नपु.)** – शिक्षेची भिती किंवा भय.

**वेधमानेहि (वेधमान वि.)** – थरथरणाऱ्या, कापणाऱ्या.

**सीतं वेदयसे भुसं** – तुला चांगली थंडी वाजत आहे.

**परिपुच्छसि (परिपुच्छति क्रि.)** – विचारतेस.

**मण्डूककच्छपा** – बेडूक आणि कासवे.

**नाग (पु.)** – पाणसर्प, जलसर्प.

**ओरब्भिका (ओरब्भिक पुं.)** – मेंढे मारणारे खाटिक.

**मिगबन्धका (मिगबन्धका पुं.)** – फासेपारधी.

**वज्झघाता (वज्झघात पुं.)** – वध करणारा, खून करणारा.

**सीते (सीत वि.)** – गारठ्यात, थंडीत.

**भयट्टुता (भय+अट्टिता – वि.)** – भयाने आर्त झालेली.

**गत्तेहि (गत – नपुं.)** – अवयवांनी, गात्रांनी.

**जानन्ती (वि.)** – जाणणारी.

**उदकाभिसेचना (उदका भिसेचना–नपु.)**–पाण्यात स्नान करण्याने.

**सुसुमारा (सुसुमार – पुं)** – सुसरी.

**मच्छिका (मच्छिक – पु.)** – मासे मारणारे.

**पुब्बेकतं (वि.)** – पूर्वी केलेले.

**साटकं (साट पुं.)** – आंघोळीचे वस्त्र, पंचा.

**मा ते सीतं छवि हने** – थंडीने तुझ्या शरीरावर वाईट परिणाम न होवो.

❑❑❑